सकाळ, मंगळवार, २८ जून, २०११, "सकाळ विशेष", पृष्ठ क्रमांक ७

# 'लोणार'मधील जिवाणू मंगळावरील नाहीत

## 'नासा'ने ठरविले संशोधन हास्यास्पद, अमरावती विद्यापीठाने मागविले स्पष्टीकरण

**रमाकांत दाणी** : सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २७ : जगप्रसिद्ध लोणार सरोवराची निर्मिती कशी झाली, याबाबतचे गूढ उकलण्याचे प्रयत्न जगभरातील संशोधकांकडून आपापल्या परीने चालूच असले, तरी मंगळावरील अशनी आदळल्याने ही निर्मिती झाल्याचा वैदर्भीय संशोधकाचा दावा 'नासा'ने हास्यास्पद ठरविला आहे. हा दावा करणाऱ्या संशोधकाला अमरावती विद्यापीठाने आता स्पष्टीकरण मागविले आहे.

विदर्भाच्या बुलडाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर संशोधकांच्या दृष्टीने कुतुहलाचे केंद्र ठरले आहे. खाऱ्या पाण्याच्या या सरोवरावर अभ्यास करण्यासाठी संशोधकांचा वर्ग सातत्याने लोणारला भेट देत असतो. सरोवराची निर्मिती ज्वालामुखीतून झाली, हा पूर्वीचा दावा मागे पडून उल्कापातातूनच ही निर्मिती झाल्याचे मागील काही वर्षांत स्पष्ट झाले आहे. तथापि, दोन महिन्यांपूर्वी अमरावती विद्यापीठाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील डॉ. डी. एस. तांबेकर यांच्या दाव्याकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. मंगळावरील अशनी आदळल्याने सरोवराची निर्मिती झाली, असा दावा त्यांनी काही संशोधनाअंती केला होता. या दाव्याच्या समर्थनार्थ डॉ. तांबेकर यांनी लोणार सरोवरात 'बेसीलस ओडीसी' हा अत्यंत दुर्मिळ जिवाणू सापडल्याचा दावा केला. अमेरिकेच्या 'नासा' या संशोधन संस्थेच्या मोहिमेत हा जिवाणू मंगळावर आढळून आल्याची माहिती डॉ. तांबेकर यांनी दिली होती. त्यामुळेच लोणारच्या निर्मितीचा संबंध थेट मंगळ ग्रहाशी जोडता येईल, असेही त्यांचे म्हणणे होते. महाराष्ट्रातील काही संशोधकांनी या संदर्भात 'नासा'चे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. कस्तुरी व्यंकटेश्वरन यांच्याशी संपर्क साधून विचारणा केली. त्यावर डॉ. व्यंकटेश्वरन यांनी हा दावा अतिशय हास्यास्पद असल्याचे स्पष्ट केले. मुळात 'बॅसीलस ओडीसी' हा जिवाणू मंगळावरील नाही, असे नमूद करताना डॉ. व्यंकटेश्वरन यांनी त्याबाबत सविस्तर माहिती देणारा 'ई-मेल' अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू, तसेच कुलसचिवांना पाठविला आहे.

पुण्याच्या नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्स (एनसीसीएस) संस्थेतील ज्येष्ठ संशोधक श्रीकांत पवार यांनीही त्याला दुजोरा दिला. ''बॅसीलस ओडीसी हा जिवाणू पृथ्वीवरील आहे. त्यामुळे लोणारच्या निर्मितीचा मंगळ ग्रहाशी संबंध जोडणे योग्य नाही. आपण हे यापूर्वीच स्पष्ट केले आहे,'' असे त्यांनी नमूद केले. अमरावतीच्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मोहन खेडकर यांनी या संशोधनाचा विद्यापीठाशी संबंध नसल्याचे सांगत कुठलीही प्रतिक्रिया व्यक्त करण्यास नकार दिला. 'नासा'च्या ज्येष्ठ वैज्ञानिकाकडून विद्यापीठाला खुलासा करणारा ई-मेल आल्याची माहिती देताना विद्यापीठाचे कुलसचिव जोशी म्हणाले, ''या प्रकरणी डॉ. तांबेकर यांना विद्यापीठाने स्पष्टीकरण मागविले आहे. मुळात हा दावा करताना त्यांनी विद्यापीठाची परवानगी घेतली नव्हती,'' अशी माहिती त्यांनी दिली.

### डॉ. तांबेकरांचे घूमजाव

**डॉ. तांबेकर यांनी आता आपल्या कथित संशोधनावर घूमजाव केले आहे. ''मी असा दावा कधीही केला नव्हता,'' असे ते म्हणाले. ''लोणारमध्ये सापडलेल्या त्या जिवाणूचे 'बॅसीलस ओडीसी' या जिवाणूशी ९६ टक्के साधर्म्य असल्याचे त्यांनी नमूद केले. तथापि, 'बॅसीलस ओडीसी' जिवाणू मुळातच मंगळावरील नाही, या 'नासा'च्या वैज्ञानिकांच्या स्पष्टीकरणावर काहीही बोलण्यास त्यांनी नकार दिला.**